# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.08.2025** **वार- बुधवार**

---

**परिसंवाद**

भारतीय वायु दलाच्या मेंटेनन्स कमांड मुख्यालयाद्वारे पुण्यातील बेस रिपेअर डेपोमध्ये गेले दोन दिवस विमान वाहतुक क्षेत्रातील इलेक्ट्रॉनिक्स विकासातील आव्हाने आणि उत्पादन जीवनचक्र व्यवस्थापन यावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. मेंटेनन्स कमांडचे प्रमुख एयर मार्शल विजय कुमार गर्ग यांनी देशीकरण, परिवर्तनीय इंजिनियरींग आणि संरचित जीवन चक्र याद्वारे एवियोनिक्समध्ये स्वयंपूर्णतेसाठी वायु दल करत असलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला. डीआरडीओ, सेमीलॅक, राष्ट्रीय एरोनॉटिक्स लिमिटेड, भारतीय सेना, नौदल आणि शंभरहून अधिक उद्योग भागीदार यावेळी उपस्थित होते.

**लंपी**

राज्यात आतापर्यंत 25 जिल्ह्यांमध्ये 9 हजार 820 जनावरांना लम्पी रोगाची लागण झाली असून, 339 जनावरांचा मृत्यू झाला आहे. रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी सुमारे 93 टक्के जनावरांना लस देण्यात आली असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली. लसीकरणासाठी शेळीतील देवीची अर्थात गोट पॉक्सची लस दिली जात असून, परिणामी एकंदर गोवंशीय पशुधनाच्या तुलनेत लम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव अत्यल्प आहे.

**स्वावलंबन योजना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनांच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. लाभार्थ्यांकरिता लागू असलेली दीडलाख रुपये वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

**ठेकेदार**

पुणे महापालिकेच्या विविध विभागांची परवानगी न घेता पुणे महानगर परिवहन महामंडळाची बसस्थानकं उभारणाऱ्या ठेकेदाराविरूद्ध दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय पुणे महापालिकेनं घेतला असून, त्याच्याकडून तिप्पट दंड वसूल केला जाणार आहे. संबंधित ठेकेदाराकडून उभारण्यात येणाऱ्या बस थांब्यांचं काम थांबविण्यात आलं असून शहरात किती ठिकाणी बस थांबे उभारण्यात आली आहेत, त्याचं सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत असं पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितलं.

**खड्डे**

पुणे महापालिकेच्या पथ विभागाने शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांची माहिती देण्यासाठी पीएमसी रोड मित्र ॲप तयार केलं आहे. या ॲपचं उद्घाटन पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते आज झालं. या मोबाइल ॲपच्या माध्यमातून नागरिकांनी रस्त्यावरील खड्ड्यांचे फोटो थेट महापालिका प्रशासनाला पाठविल्यानंतर 72 तासात खड्डा बुजविला जाणार आहे. खड्डे बुजविल्याचं छायाचित्र तक्रारदाराला पाहता येणार आहे.

**सीसीटीव्ही**

पुणे शहरात शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही असेल तरच आरटीओद्वारे त्यांना तंदुरूस्ती प्रमाणपत्र दिलं जात आहे. तसंच आरटीओच्या वायुवेग पथकाकडूनही विशेष मोहीम राबवून सर्व वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे. दोषी वाहन चालकांवर तत्काळ कारवाई केली जाणार असल्याचं पुणे  उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी सांगितलं.  स्कूल बसमध्ये शालेय विद्यार्थी, लहान मुलांबरोबर घडलेल्या प्रकरणातून पुणे पोलिस आणि परिवहन विभागाकडून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीनं सर्व स्कूल बस आणि व्हॅनमध्ये सीसीटीव्ही बसविणं बंधनकारक करण्याचे आदेश दिले आहेत.

**सोनाग्रा**

राज्यघटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आचार्य प्र. के. अत्रे यांचं निस्सिम प्रेम होतं अशी आठवण ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनाग्रा यांनी आज पुण्यात एका कार्यक्रमात सांगितली. आर.के. सोनाग्रा फौंडेशनतर्फे 'आचार्य अत्रे बालसाहित्य पुरस्कार' ज्येष्ठ बालसाहित्यिक आणि चित्रकार ल.म.कडू यांना प्रदान करताना सोनाग्रा बोलत होते.

**निवड**

दिल्लीतील कॉन्स्टिटयूशन क्लबच्या काल झालेल्या निवडणुकीत मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे कार्यकारी सदस्य पदावर विजयी झाले. कार्यकारी सदस्यांच्या निवडणुकीत 11

जागांसाठी 14 जणांनी अर्ज भरले होते. महाराष्ट्रातून खासदार श्रीरंग बारणे यांचा एकमेव अर्ज दाखल होता.  लोकसभा, राज्यसभेच्या 669 विद्यमान आणि माजी खासदारांनी मतदान केलं.

**निर्मूलन**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ड आणि ब क्षेत्रीय कार्यालयांच्या वतीनं मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्गालगत असणाऱ्या सेवा रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी अतिक्रमण निर्मूलन मोहिम राबवण्यात आली. पवना नदी पुलापासून मुळा नदी पुलापर्यंत अंदाजे 7 किलोमीटर लांबीच्या मुख्य महामार्गालगत दोन्ही बाजूंच्या 24 मीटरपर्यंत सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणं काढण्यात आली. यासाठी 110 बांधकामांना नोटीस देऊन कारवाई करण्यात आली.

**पथनाट्य**

पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाकडून 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत महापालिका 'हर घर तिरंगा – हर घर स्वच्छता' या विशेष मोहिमेच्या माध्यमातून शहरात देशप्रेम आणि स्वच्छतेची जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. तीन टप्प्यांत ही मोहीम 15 ऑगस्टपर्यंत राबविली जाणार आहे. याअंतर्गत आज भोसरी इथं स्वच्छताविषयक पथनाट्य सादर झालं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**